**ठळक बातम्या**

- केंद्रीय नागरी हवाई वाहतूकमंत्री जोतिरादित्य शिंदे यांचा कागल इथं युवा मतदारांशी थेट संवाद /आठ वर्षांपूर्वी जगात ११ क्रमांकावर असलेली भारतीय अर्थव्यवस्था ५ व्या क्रमांकावर आणण्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नांना यश आलं असल्याचं प्रतिपादन.

- पर्यावरण संरक्षण, कोरोनामुळे निर्माण झालेली परिस्थिती, आणि विषमते विरुध्द लढण्यासाठी सर्व देशांनी एकत्र येण्याचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांचं भारत प्रशांत क्षेत्रीय संवादात आवाहन

- ५५ व्या राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या महिला खो-खो संघाला विजेतेपद /पुरुषांमधे, भारतीय रेल्वे अजिंक्य

- **आणि**

- ऑकलंड इथं झालेल्या पहिल्या एक दिवसीय सामन्यात न्युझिलंडकडून भारत पराभूत

<><><><><>

केंद्रीय नागरी हवाई वाहतूकमंत्री जोतिरादित्य शिंदे यांनी आज कागल येथे युवा मतदारांची भेट घेऊन थेट संवाद साधला. त्यांच्या अपेक्षा जाणून घेण्याचा प्रयत्न केला. आठ वर्षांपूर्वी जगात भारतीय अर्थव्यवस्था ११ व्या क्रमांका वर होती. आठ वर्षांत भारतीय अर्थव्यवस्था जगात ५ व्या क्रमांका वर आणण्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. २०३० पर्यंत आपण जपान आणि जर्मनीला मागे टाकून तिसऱ्या क्रमांकावर येण्याचे ध्येय ठेवले आहे. लोकशाहीत विकास आणि प्रगतीचा मार्ग प्रशस्त आणि सर्वसमावेशक झाला तर देशाची प्रगती लवकर होते

असेही त्यांनी सांगितले. शिंदे यांनी सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करुन केलं.

<><><><>

पर्यावरणाच्या संरक्षणासाठी, कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी तसंच व्यापक असमानते विरुध्द लढण्यासाठी सर्व देशांनी एकत्र येणं गरजेचं असल्याचं मत संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी व्यक्त केलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं आयोजित भारत प्रशांत क्षेत्रीय संवाद २०२२ या कार्यक्रमात बोलत होते. विनाशकारी युध्द आणि संघर्षाची पर्वा न करता सर्व देशांनी एकत्रीतपणे या समस्यांचा सामना करायला हवा, असंही ते म्हणाले. ते पुढे म्हणाले की, बाली इथं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी युद्धाच्या युगाचा अस्त झाल्याचं म्हटलं होतं. प्रधानमंत्र्यांच्या या संदेशाचं सर्व देशाच्या नेत्यांनी स्वागत केलं. सामुहिक सुरक्षेचा मापदंड बदलण्याची गरज सिंग यांनी व्यक्त केली. जगाच्या आर्थिक स्थैर्यासाठी भारत - प्रशांत क्षेत्राचा विकास होणं गरजेचं आहे. विभिन्न देशातल्या सागरी मार्गांमुळे व्यापार वाढीला चालना मिळाली असल्याचं ते म्हणाले. भारत- प्रशांत क्षेत्रात आसियानची मध्यवर्ती भूमिका स्वागतार्ह आहे. बहुपक्षीय नितीचं ध्येय वर्तालाप करुनच साध्य होईल, यावर त्यांनी जोर दिला.

<><><><>

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचा आज ३९वा स्मृतिदिन आहे. त्यानिमित्त त्यांना देशभरात अभिवादन केलं जात आहे. राज्यातही विविध उपक्रमाद्वारे त्यांना आदरांजली वाहण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कराड इथल्या प्रीतिसंगमावर असलेल्या त्यांच्या स्मृतिस्थळावर पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली अर्पण केली. यशवंतराव चव्हाण यांची नाळ कष्टकरी, शेतकऱ्यांशी जुळलेली होती, पदाच्या माध्यमातून त्यांनी त्यांचे प्रश्न सोडवले आणि सर्वच क्षेत्राचा विकास हे

त्यांचे ध्येय होते, यासाठीचे निर्णय त्यांनी घेतले, असं वक्तव्य मुख्यमंत्र्यांनी कराड इथं केलं. यशवंतराव चव्हाण कृषी-औद्योगिक, आणि पशु-पक्षी प्रदर्शनाचं त्यांच्या हस्ते उदघाटन झालं. त्यानंतर आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री शंभुराज देसाई, मंत्री उदय सामंत, खासदार श्रीनिवास पाटील, आमदार बाळासाहेब पाटील आणि इतर लोकप्रतिनिधी उपस्थित होते. राज्य सरकारनं सर्वसामान्यांना केंद्रबिंदू मानत अनेक निर्णय घेतले आहेत आणि हे निर्णय सर्वसामान्यांना न्याय देणारे असल्यामुळे त्यांना आवडल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. कराड विमानतळाचा विकास करण्यासाठी आवश्यक असणारा विकास आराखडा तयार करून तो सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. यशवंतराव चव्हाण यांनी शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण, सहकार, सिंचन, आरोग्य अशा अनेक क्षेत्रात महाराष्ट्राच्या विकासाचा भक्कम पाया रचला, अशा शब्दांत विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी चव्हाण यांना अभिवादन केलं आहे. समाजातल्या मागास, आदिवासी, अल्पसंख्याक, महिला, युवक या घटकांना मुख्य प्रवाहात आणून यशवंतरावांनी विकासाची संधी दिली. त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणाला, समाजकारणाला सुसंस्कृत चेहरा दिला. त्यांनी रचलेल्या पायावरच आजचा आधुनिक, प्रगत, पुरोगामी महाराष्ट्र उभा आहे. त्यांच्या स्वप्नातला महाराष्ट्र घडवणं हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल असं ते म्हणाले. 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालया'त चव्हाण यांच्या साहित्याचं प्रदर्शन आयोजित करण्यात आलं आहे. त्यात यशवंतराव चव्हाण यांनी लिहिलेली आणि त्यांच्यावर लिहिलेली अशी शंभर उत्तम निवडक पुस्तकं आहेत.

**<><><><><>**

संसदेच्या आगामी हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारनं येत्या ६ डिसेंबरला सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. या अधिवेशनात संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत चालावं, यासाठी सर्व राजकीय पक्षांचं सहकार्य

मिळवण्याकरता ही बैठक आयोजित केली आहे. या अधिवेशनात विधायक चर्चा होतील, अशी अपेक्षा केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी व्यक्त केली आहे. हिवाळी अधिवेशन येत्या ७ डिसेंबरला सुरु होणार आहे. हे २९ डिसेंबरपर्यंत चालेल.

<><><><><>

लीथ सॉफ्ट शेल प्रजातीच्या कासवांचं संरक्षण वाढवण्याच्या भारताच्या प्रस्तावाला पनामा वन्यजीव शिखर संमेलनात मान्यता मिळाली आहे. लुप्तप्राय प्रजातींच्या आंतरराष्ट्रीय व्यापार कराराअंतर्गत लीथ सॉफ्ट शेल कासवांचं सरंक्षण वाढवण्यासाठी या प्रजातिला परिशिष्ट- दोन मधून परिशिष्ट- एक मध्ये स्थानांतरित करण्याचा प्रस्ताव भारतानं ठेवला होता. हा प्रस्ताव मंजूर झाल्यामुळं या कासवांच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराला आळा बसू शकेल. लीथ सॉफ्ट शेल प्रकारची कासवं भारतात काही निवडक नद्या आणि तलावांमध्ये आढळतात. गेल्या तीस वर्षांमध्ये यांची संख्या ९० टक्के घटली आहे.

<><><><><>

‘स्मार्ट’ प्रकल्प हा राज्यातील कृषी क्षेत्रासाठी चित्र पालटवणारा असेल असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. जागतिक बँकेचे भारतातील संचालक ऑगस्टे तानो कौमे यांच्या अध्यक्षतेखालील शिष्टमंडळानं उपमुख्यमंत्र्यांची काल राजभवन इथं भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते. राज्यातलं कृषिक्षेत्र, वातावरणीय बदलांना अनुकूल करण्याचे प्रयत्न होत आहेत, या प्रकल्पादरम्यान विकसित होणाऱ्या कालव्यांमुळे शेती आणि शेतकरी अधिक समृद्ध होणार आहे असं ते म्हणाले. यावेळी शिष्टमंडळातले मान्यवर आणि वरिष्ठ सनदी अधिकारी उपस्थित होते. पोक्रा – २ हा जवळपास ६०० दशलक्ष डॉलर्सच्या गुंतवणूक प्रकल्पाची राज्यात अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीनं यावेळी सकारात्मक चर्चा करण्यात

आली. राज्यात युवकांची संख्या मोठ्या प्रमाणात असून या तरुणांना कौशल्य आधारित शिक्षण देण्यासाठी कौशल्य विकासाशी संबंधित पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणावर भर देण्यात येत आहे असं फडनवीस यांनी सांगितलं.

<><><><><>

जागतिक नेत्यांच्या क्रमवारीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पहिल्या स्थानावर कायम आहे. अमेरिकेतल्या मार्निंक कन्सल्ट या मानांकन संस्थेनं प्रसिद्ध केलेल्या जागतिक नेतृत्व मानांकनात मोदी सर्वात लोकप्रिय नेते ठरले आहेत. त्यांच्या पाठोपाठ मेक्सिकोचे अध्यक्ष अँड्रेस मॅन्युएल लोपेस ओब्राडोर दुसऱ्या, तर ऑस्ट्रलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानिस तिसऱ्या स्थानावर आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन नवव्या, तर युनाएटेड किंगडमचे प्रधानमंत्री ऋषी सुनक त्यांच्या मागं आहे. १६ ते २२ नोव्हेंबर या काळात संकलित केलेल्या माहितीच्या आधारे हे मानांकन दिलं आहे.

<><><><><>

गोव्यात सुरु असलेल्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात इफ्फीमधे,भविष्यातल्या ७५ सृजनात्मक प्रतिभा या , सत्राच्या दुसऱ्या भागाची, ५३ तासांच्या आव्हानातील विजेत्यांना पुरस्कार देऊन सांगता झाली. या स्पर्धेत देशभरातील ७५ प्रतिभावंत दिग्दर्शकांची निवड करुन त्यांना इंडीया ॲट हंड्रेड या विषयावर ५३ तासात लघुपट बनवण्याचं आव्हान दिलं होतं. माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी २१ नोव्हेंबर रोजी याची घोषणा केली होती. ५३ तासात ५ लघुपट बनवण्यात आले. टीम पर्पलच्या, डियर डायरीला सर्वश्रेष्ठ लघुपटाचा पुरस्कार मिळाला. अंतरदृष्टि (द इनसाइट), द रिंग, ऑलमोस्ट आणि सौ का नोट हे यातले इतर चार चित्रपट आहेत. येत्या रविवारी रात्री नऊ वाजता शॉर्ट्स

टिव्हीवर देशभरात हे चित्रपट दाखवले जातील. या स्पर्धेचं आयोजन राष्ट्रीय चित्रपट विकास प्राधिकरणानं शॉर्ट्स टिव्हीच्या सहकार्यानं केलं होत.

<><><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगड तालुक्यातल्या कातवण इथून देवगड हापूसची पहिली पेटी मुंबई-वाशी बाजारात रवाना झाली आहे. दिनेश शिंदे आणि प्रशांत शिंदे या दोन युवा आंबा बागायतदारांनी हा आंबा त्या ठिकाणी पाठवला आहे. शिंदे बंधूच्या बागेतल्या हापूस कलमांना १५ ऑगस्ट पासूनच मोहर येण्यास सुरुवात झाली होती. मात्र काही कलमावर आलेला मोहर गळून पडला. यातल्या चार ते पाच कलमावरचा मोहोर तसाच टिकून राहिला. तो टिकवण्यासाठी या बंधूंनी खूप मेहनत घेतली. या दोन डझनच्या आंबा पेटीला साधारणतः सात ते आठ हजारच्या आसपास भाव मिळेल, असा अंदाज शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

<><><><><>

देशव्यापी कोविड प्रतिबंधक लसीकरण मोहिमेत आज सकाळपासून ३९ हजारांपेक्षा जास्त नागरिकांचं लसीकरण झालं. त्यामुळे आतापर्यंत लाभार्थ्यांना दिलेल्या मात्रांची एकूण संख्या २१९ कोटी ८९ लाखाच्या वर गेली आहे. त्यात २२ कोटी १२ लाखापेक्षा जास्त लाभार्थ्यांनी खबरदारीची लसमात्रा घेतली आहे. राज्यात आज सकाळपासून १ हजार ७३१ नागरिकांचं लसीकरण झालं. राज्यात आत्तापर्यंत लाभार्थ्यांना दिलेल्या मात्रांची एकूण संख्या १७ कोटी ७५ लाखाच्या वर गेली आहे. त्यात ९४ लाख ५ हजारांपेक्षा जास्त नागरिकांनी खबरदारीची लसमात्रा घेतली आहे.

<><><><><>

उस्मानाबाद इथं आयोजित ५५ व्या राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत यजमान महाराष्ट्राच्या महिला खो-खो संघानं विजेतेपद कायम राखलं. काल झालेल्या अंतिम

सामन्यात त्यांनी भारतीय विमान प्राधिकरण संघावर ११-९ असा डावानं शानदार विजय मिळवला. महाराष्ट्राच्या महिला संघाचं हे २३ वं विजेतेपद आहे. पुरुषांमधे, भारतीय रेल्वेनं यजमान महाराष्ट्रावर १४-१२ असा ४५ सेकंद राखून  विजय मिळवला. रेल्वेचं हे ११ वं विजेतेपद आहे. भारतीय खोखो महासंघ आणि महाराष्ट्र खो-खो असोसिएशन यांच्या मान्यतेनं उस्मानाबाद जिल्हा खोखो असोसिएशननं ही स्पर्धा आयोजित केली होती. महाराष्ट्राची अपेक्षा सुतार राणी लक्ष्मीबाई पुरस्काराची मानकरी ठरली, तर रेल्वेचा अक्षय गणपुले एकलव्य पुरस्कारचा मानकरी ठरला. पुरस्कारप्राप्त पुरुष आणि महिला खेळाडूना उस्मानाबाद जनता सहकारी बँकेतर्फे प्रत्येकी पाच हजार रुपयांचं पारितोषिक देण्यात आलं.

<><><><>

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात ऑकलंड इथं आज झालेल्या मालिकेतल्या पहिल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात न्यूझीलडनं भारताचा ७ गडी राखून पराभव केला. विजयासाठी ३०७ धावांचं लक्ष्य घेऊन मैदानात उतरलेल्या न्यूझीलंडनं ४८ व्या षटकातच लक्ष्य पूर्ण केलं. त्यांची ३ बाद ३०९ अशी धावसंख्या झाली. टाॅम लॅथम १४५ धावांवर नाबाद राहिला. केन विल्यमसननं ९४ धावा करून त्याला सुरेख साथ दिली. तत्पूर्वी भारतानं ५० षटकात ७ गडी बाद ३०६ धावा केल्या. श्रेयस  अय्यरनं ८०, शिखर धवननं ७२, शुभमन गिलनं ५० धावा करून भारताच्या धावसंख्येला आकार दिला.

<><><><>

फीफा विश्वचषकात काल दोहा इथं एच गटात झालेल्या रोमांचक सामन्यात पुर्तगालनं **३-२** ने घानाला पराभूत केलं. पुर्तगालचा कर्णधार क्रिस्टियानो रोनाल्डोनं स्पर्धेत पहिल्याच सामन्यात गोल करुन विश्वविक्रम रचला. २००६, २०१०,

२०१४, २०१८ आणि २०२२ या पाच विश्वचषकात गोल करणारा तो पहिला फुटबॉलपटू बनला आहे. जी गटाच्या दुसऱ्या एका सामन्यात ब्राजीलनं **२-० ने** सर्बियाला हरवत दमदार सुरुवात केली. तर उरुग्वे आणि दक्षिण कोरिया यांच्यातला सामना अनिर्णित राहिला. फुटबॉल विश्वचषकात आज तीन सामने खेळले जाणार आहेत. बी गटात वेल्स आणि ईराण यांच्यात लढत होईल, ए गटात कतर आणि सेनेगल यांच्यात सामना होईल तर नेदरलॅंडचा सामना इक्वाडोर बरोबर होणार आहे.

<><><><>

**म**हानिर्मिती कंपनीनं "सहाय्यक अभियंता" आणि "कनिष्ठ अभियंता" पदांची रिक्त पदं सरळसेवा प्रवेशाद्वारे भरण्याकरता जाहिरात प्रसिद्ध केली आहे. यासाठी अर्ज करणाऱ्या सर्व उमेदवारांना, महाराष्ट्र राज्याचं अधिवास प्रमाणपत्र बंधनकारक असल्याची अधिसूचना महानिर्मितीनं २१ नोव्हेंबर रोजी काढली आहे. त्याची प्रत महानिर्मितीच्या www.mahagenco.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या **प**दांकरता अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख १७ डिसेंबर २०२२ आहे.

<><><><>

गुजरात विधानसभा निवडणूकीला आता काहीच दिवस उरल्यानं प्रचार शिगेला पोहचला आहे. केन्द्रीय मंत्री अमित शहा यांच्यासह अनेक वरिष्ठ भाजपा नेत्यांच्या आज राज्यात जाहीर सभा आणि रोड शो होणार आहेत. केन्द्रीय मंत्री स्मृती इराणी यांची वलसाड इथं, धर्मेन्द्र प्रधान यांची सुरत, पुरषोत्तम रुपाला यांची नवसारीत प्रचारसभा होणार आहे. तर ज्येष्ठ कॉंग्रेस नेते राजीव शुक्ला आणि अलोक शर्मा यांची अहमदाबाद इथं वार्ताहर परिषद होणार आहे.

<><><><>

बीड जिल्ह्यातल्या ७०४ ग्रामपंचायतीच्या निवडणुका घोषित झाल्या आहेत. १८ डिसेंबरला मतदान होणार आहे, तर २० डिसेंबर ला मतमोजणी आहे. आदर्श

आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सूचना दिल्या आहेत.

**<><><><><>**

नवी दिल्लीतल्या प्रगती मैदानावर ४१ वा आंतरराष्ट्रीय व्यापार मेळाव्याला १४ नोव्हेंबरपासून सुरूवात झाली आहे. महाराष्ट्र या यावर्षी ‘भागीदार राज्य’ म्हणून सहभागी झाला आहे. महाराष्ट्र दालन हे सर्वसामवेश असे दालन आहे. या दालनात बचत गट, लघु उद्योजक, विविध वस्तू उत्पादन समूह केंद्रांच्यावतीनं विविध स्टॉल लावलेले आहेत. बचत गट, लघु उद्योजकांनी उत्पादित केलेल्या मालाला या व्यापार मेळाव्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याची प्रतिक्रिया स्टॉल धारकांनी दिली. फळ प्रक्रिया उद्योगा पासून ऑटोमोबाईल उद्योगापर्यंत सगळ्यांचे स्टॉल लक्ष वेधून घेत आहेत. येत्या २७ तारखेपर्यंत हा मेळावा सुरू राहणार आहे .

//<><><><><>//